महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

न्यु. एक्सलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ – २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.कशिप्र१४२० /सूचना/२०२०/२५६ दि.०१/०२/२०२१

## (मॉप अप फेरीबाबत सूचना)

दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा प्रक्रीया २०२०-२१ मधील कॅप फेरी-२ नंतर रिक्त राहिलेल्या जागा मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीद्वारे (समुपदेशन) भरणेसाठी खालीलप्रमाणे प्रक्रीया राबविण्यात येईल.

- दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा प्रक्रीया २०२०-२१ मधील कॅप फेरी-२ नंतर रिक्त राहिलेल्या जागा समुपदेशनाद्वारे भरण्यासाठी मान्यता घेण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक ८ व ९ (राखीव) फेब्रुवारी २०२१ रोजी मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येईल.
- सदर फेरीसाठी www.mahacet.org या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या दृष्यकला पदवी प्रथम वर्ष (२०२०-२१) प्रवेशासाठीच्या महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारी असलेले व अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट असलेले सर्व उमेदवार पात्र असतील.
- मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीसाठी संबंधित संकेतस्थळावर दि.०३ फेब्रुवारी २०२१ रोजी शासकीय व खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालयातील कॅप फेरी २ नंतर रिक्त राहिलेल्या जागांची प्रवर्गनिहाय यादी प्रदर्शित करण्यात येईल तसेच फेरीदरम्यान ऐनवेळी रिक्त झालेल्या जागा सुद्धा भरण्यात येतील.
- मॉप अप फेरीसाठी दर्शविलेल्या रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली होती, त्या प्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येतील, तदनंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.
- मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीसाठी उमेदवारांनी त्यांच्या अर्जावर नमुद केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तात्काळ सादर करणे आवश्यक असतील.

- ज्या उमेदवारांनी त्यांची मुळ कागदपत्रे कला महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रीयेदरम्यान दाखल केली असतील अशांनी त्या संबंधित कला महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र **(संबंधित महाविद्यालयाच्या लेटरहेडवर कागदपत्रे (कागदपत्रांच्या नावानिशी) महाविद्यालयाकडे जमा असल्याबाबत लेखी प्रमाणपत्र )** सादर करणे आवश्यक असेल.
- अगोदर प्रवेश घेतलेल्या उमेदवारास मॉप अप फेरीदरम्यान नवीन कला महाविद्यालयात जागा नियतवाटप झाल्यास त्याची जागा मॉप अप फेरीसाठी नोंदणी केलेल्या गुणवत्ता यादीतील संबंधित उमेदवारापासुन उतरत्या क्रमाने गुणवत्ता यादीतील उर्वरीत उमेदवारांना उपलब्ध करण्यात येईल.
- मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी दि.०४ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ०७ वाजेनंतर दि.०५ फेब्रुवारी २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत आपल्या नोंदणीकृत लॉगीन आयडी वरून रजिस्ट्रेशन फॉर मॉप अप राऊंड या लिंक द्वारे नोंदणी प्रक्रीया पुर्ण करुन ऑनलाईन पोच पावती प्राप्त करणे आवश्यक आहे.
- मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीकरिता नोंदणी केलेल्या उमेदवारांनी नोंदणी अर्जाची ऑनलाईन पोच पावतीसह **समुपदेशन फेरीसाठी नियुक्त केंद्र सर ज. जी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई** येथे वेळापत्रकातील दिलेल्या नियोजित वेळेनुसारच उमेदवारास प्रवेश दिला जाईल. सदर **मॉप-अप फेरीस आवेदनपत्र सादर केलेल्या व पोचपावती मिळालेल्याच** केलेल्या उमेदवारांचाच मॉप अप फेरीमध्ये समावेश करण्यात येईल.
- अखिल भारतीय उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या जागा मॉप अप फेरीसाठी उपलब्ध करणे, सदर जागा भरणेकरीता अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या मॉप अप फेरीसाठी नोंदणीकृत उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. अखिल भारतीय उमेदवारी असलेले मॉप अप फेरीसाठी नोंदणीकृत उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा महाराष्ट्र राज्य उमेदवारांकरिता Inter se merit नुसार उपलब्ध करण्यात येतील.

**मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीकरिता उमेदवारांचे पात्रता निकष (दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनामार्फत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था) प्रवेश व शुल्क यांचे विनियमन (अधिनियम ,२०१५, सुधारित २०१९ व २०२० यांस अधीन राहुन) खालील प्रमाणे लागु असतील**

1. एमएएच एएसी सीईटी २०२० प्रवेश परीक्षेच्या अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट असलेले सर्व उमेदवार. (महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार.)

2. दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठीच्या पहिल्या २ कॅप फेऱ्यांमध्ये कोठेही प्रवेश न मिळालेले उमेदवार.
3. एमएएच एएसी सीईटी २०२० प्रवेश प्रक्रीयेद्वारे शासकीय आणि खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालयात प्रवेश घेतलेले उमेदवार.

- **मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरीकरिता अरक्षित प्रवर्गातील उमेदवाराजवळ स्वतःचे जात वैधता प्रमाणपत्र तसेच प्रवर्गनिहाय आरक्षणाचा दावा केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य असेल.**
- **मॉप अप तथा विशेष प्रवेश फेरी दि.०८ व ०९ फेब्रुवारी २०२० रोजी सर ज. जी. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई येथे संचलित करण्यात येईल.**
- **मॉप अप फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयाच्या फी व सर्व मूळ कागदपत्रांसह दि.०८ ते ११ फेब्रुवारी २०२० रोजी वेळापत्रकातील नमुद केलेल्या मुदतीत प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात हजर होऊन आपला प्रवेश निश्चित करावा.**
- **उमेदवारांनी वेळापत्रकातील दिलेल्या नियोजित वेळेचे पालन करणे बंधनकारक असेल तदनंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही. (अखिल भारतीय उमेदवार दि.०८ फेब्रुवारी २०२१ वेळःदुपारी १२.३० वाजता, महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार दि.०८ फेब्रुवारी २०२१ वेळःदुपारी ०२.०० वाजता)**
- **मॉप तथा विशेष प्रवेश फेरीस उपस्थित सर्व उमेदवार व पालकांनी कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव होउ नये यासाठी आवारात शासनाद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करणे व पुर्ण प्रक्रियेदरम्यान मास्क (मुखपट्टी) चा वापर करणे बंधनकारक असेल.**

**सही/-**

**मा. आयुक्त,**

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा,**

**महाराष्ट्र राज्य, मुंबई**